सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. :0253-2230580, http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

नोंदणी कक्ष

जा.क्र. वि.से.वि-नोंदणी/2020/682 दि. 30.06.2021

सूचनापत्र - ३८

विषय — शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील तात्पुरते प्रवेशाची पात्रता (Provisional Eligibility) अंतिम पात्र करण्यासंदर्भात (Confirm)

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये विविध कारणांमुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश तात्पुरते पात्र करण्यात आलेले आहे. अशा तात्पुरत्या प्रवेशित सेमिस्टर पॅटर्न असलेल्या विद्यार्थ्यांचा मे २०२१ मध्ये आयोजित केलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आलेला नाही. तसेच वार्षिक पद्धतीच्या (Annual Pattern) शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑगस्ट २०२१ मध्ये प्रस्तावित आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्थितीतील सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश अंतिमरित्या पात्र करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील कार्यपद्धती अवलंबविण्यात येत आहे.

१. शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे प्रलंबित असलेले विद्यार्थी :-
शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरता यावा यासाठी लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर लिंक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (ycmou.digitaluniversity.ac) वर उपलब्ध आहे.
Link - https://ycmouoa2020-21.digitaluniversity.ac/login
सदर लिंक दि. २० जुलै २०२१ पर्यंत उपलब्ध राहील. संबंधित विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीच्या आत शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे अनिवार्य आहे.

२. अभ्यासकेंद्र मान्यता (Study Centre Approval) प्रलंबित असलेले तसेच शिक्षणक्रम शुल्क भरलेले विद्यार्थी :-
ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेशअर्ज भरलेला आहे, शिक्षणक्रम शुल्कही भरलेले आहे. परंतु ऑनलाईन प्रवेशअर्जास अभ्यासकेंद्राची मान्यता (Study Centre Approval) घेतलेली नाही. अशा विद्यार्थ्यांचे तात्पुरते प्रवेश अंतिमरित्या पात्र करण्यासाठी संबंधित अभ्यासकेंद्रांनी पात्र विद्यार्थ्यांची यादी त्यांच्या सही शिक्क्यानिशी विभागीय केंद्राकडे दि. २० जुलै २०२१ पाठवावी. संबंधित विभागीय केंद्राने सर्व पात्र विद्यार्थ्यांची यादी एक्सेल फॉरमेट मध्ये एकत्रित करून दि. २५ जुलै २०२१ पर्यंत मुख्यालयातील eligibility@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडी वर पाठवावे.

३. शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे प्रलंबित असलेले तसेच अभ्यासकेंद्र मान्यता (Study Centre Approval) प्रलंबित असलेले विद्यार्थी :-
ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रम शुल्काचा पहिला हप्ता भरून ऑनलाईन प्रवेशअर्ज सादर केलेला आहे आणि शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे प्रलंबित आहे तसेच ऑनलाईन प्रवेशअर्जास अभ्यासकेंद्र मान्यता (Study Centre Approval) घेतलेली नाही अशा विद्यार्थ्यांनी प्रथमतः त्यांच्या शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरावा. दुसरा हप्ता भरण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर (ycmou.digitaluniversity.ac) लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
Link - https://ycmouoa2020-21.digitaluniversity.ac/login

सदर लिंक दि. २० जुलै २०२१ पर्यंत उपलब्ध राहील. संबंधित विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीच्या आत शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे अनिवार्य आहे. शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरल्यानंतर अशा विद्यार्थ्यांचे तात्पुरते प्रवेश अंतिमरित्या पात्र करण्यासाठी संबंधित अभ्यासकेंद्रांनी पात्र विद्यार्थ्यांची यादी त्यांच्या सही शिक्क्यानिशी विभागीय केंद्राकडे दि. २० जुलै २०२१ पाठवावी. संबंधित विभागीय केंद्राने सर्व पात्र विद्यार्थ्यांची यादी एक्सेल फॉरमेट मध्ये एकत्रित करून दि. २५ जुलै २०२१ पर्यंत मुख्यालयातील eligibility@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडी वर पाठवावे.

४. विभागीय केंद्र मान्यता (Regional Centre Approval) प्रलंबित असलेले विद्यार्थी :-
ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेशअर्ज सादर केला आहे तसेच शिक्षणक्रम शुल्क भरून अभ्यासकेंद्राची मान्यता घेतलेली आहे. परंतु विभागीय केंद्र मान्यता प्रलंबित आहे. अशा विद्यार्थ्यांचे तात्पुरते प्रवेश (Provisional Admission) अंतिमरित्या पात्र करण्यासाठी विद्यार्थ्याने त्याच्या शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, शिष्यवृत्तीचा पर्याय निवडला असल्यास त्यासंबंधीची कागदपत्रे, दिव्यांग पर्याय निवडला असल्यास त्यासंबंधीची कागदपत्रे दि. २५ जुलै २०२१ पर्यंत मुख्यालयातील eligibility@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडी वर पाठवावे. मेल पाठवितांना आपले संपूर्ण नाव, प्रवेशअर्ज क्रमांक (Application Form No.) कायम नोंदणी क्रमांक, शिक्षणक्रमाचे नाव, शिक्षणक्रमाचे वर्ष इत्यादी माहिती द्यावयाची आहे.

५. शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे प्रलंबित असलेले तसेच विभागीय केंद्र मान्यता (Regional Centre Approval) प्रलंबित असलेले विद्यार्थी :-
ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रम शुल्काचा पहिला हप्ता भरून ऑनलाईन प्रवेशअर्ज सादर केलेला आहे आणि शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे प्रलंबित आहे तसेच ऑनलाईन प्रवेशअर्जास विभागीय केंद्र मान्यता प्रलंबित आहे. अशा विद्यार्थ्यांनी प्रथमतः त्यांच्या शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरावा. दुसरा हप्ता भरण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर (ycmou.digitaluniversity.ac) लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
Link - https://ycmouoa2020-21.digitaluniversity.ac/login
सदर लिंक दि. २० जुलै २०२१ पर्यंत उपलब्ध राहील. संबंधित विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीच्या आत शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरणे अनिवार्य आहे. शिक्षणक्रम शुल्काचा दुसरा हप्ता भरल्यानंतर अशा विद्यार्थ्यांचे तात्पुरते प्रवेश (Provisional Admission) अंतिमरित्या पात्र करण्यासाठी विद्यार्थ्याने त्याच्या शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, शिष्यवृत्तीचा पर्याय निवडला असल्यास त्यासंबंधीची कागदपत्रे, दिव्यांग पर्याय निवडला असल्यास त्यासंबंधीची कागदपत्रे दि. २५ जुलै २०२१ पर्यंत मुख्यालयातील eligibility@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडी वर पाठवावे. मेल पाठवितांना आपले संपूर्ण नाव, प्रवेशअर्ज क्रमांक (Application Form No.) कायम नोंदणी क्रमांक, शिक्षणक्रमाचे नाव, शिक्षणक्रमाचे वर्ष इत्यादी माहिती द्यावयाची आहे.

६. दिव्यांग पर्याय निवडून ऑनलाईन प्रवेशअर्ज सादर केलेल्या तसेच अभ्यासकेंद्र मान्यता (Study Centre Approval) घेतलेल्या परंतु विभागीय केंद्र मान्यता (Regional Centre Approval) प्रलंबित असलेले विद्यार्थी :-
ज्या विद्यार्थ्यांनी दिव्यांग पर्याय निवडून ऑनलाईन प्रवेशअर्ज सादर केला आहे तसेच अभ्यासकेंद्राची मान्यता घेतलेली आहे. परंतु विभागीय केंद्र मान्यता प्रलंबित आहे. अशा विद्यार्थ्यांचे तात्पुरते प्रवेश (Provisional Admission) अंतिमरित्या पात्र करण्यासाठी विद्यार्थ्याने त्याच्या शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, दिव्यांग प्रमाणपत्र दि. २५ जुलै २०२१ पर्यंत मुख्यालयातील eligibility@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडी वर पाठवावे. मेल पाठवितांना आपले संपूर्ण नाव, प्रवेशअर्ज क्रमांक (Application Form No.) कायम नोंदणी क्रमांक, शिक्षणक्रमाचे नाव, शिक्षणक्रमाचे वर्ष इत्यादी माहिती द्यावयाची आहे.

७. शिष्यवृत्तीचा पर्याय निवडून अंशतः शिक्षणक्रम शुल्क भरणे प्रलंबित असलेले विद्यार्थी :-
ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा अंशतः शुल्काचा पर्याय निवडून ऑनलाईन प्रवेशअर्ज भरलेला आहे, परंतु अंशतः शुल्क भरलेले नाही अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश तात्पुरते मान्य करण्यात आले आहे. सदरचे प्रवेश अंतिमरित्या मान्य करण्यासाठी अशा विद्यार्थ्यांनी आपल्या अंशतः शुल्काची रक्कम डी. डी. द्वारे विद्यापीठात पोस्टामार्फत पाठविणे. अंशतः शुल्काचा डी. डी. "वित्त अधिकारी, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक" यांच्या नावाने आणि नाशिक येथे देय असलेला असावा. डी. डी. सोबत विद्यार्थ्यांनी स्वतंत्रपणे प्रवेशअर्ज क्रमांक, संपूर्ण नाव, कायम नोंदणी क्रमांक, अभ्यासकेंद्र संकेतांक आणि शिक्षणक्रमाचे नाव इत्यादी तपशील नमूद करावा. सदर डी. डी. नोंदणी कक्ष, य.च.म.मुक्त विद्यापीठ, या पत्त्यावर दि. २० जुलै २०२१ पर्यंत पाठवावा.

८. शिष्यवृत्तीचा शुन्य शुल्क भरून पर्याय निवडून प्रवेशअर्ज सादर केलेले विद्यार्थी :-
ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा पर्याय स्विकारून ऑनलाईन प्रवेशअर्ज सादर केलेला आहे परंतु त्यांना शिक्षणक्रम शुल्क लागू होत नाही (Zero Fee - SC Category) अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशअर्जास अभ्यासकेंद्र मान्यता (Study Centre Approval) तसेच विभागीय केंद्र मान्यता (Regional Centre Approval) झालेले नाही अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे शिष्यवृत्ती संबंधित कागदपत्रे आणि शिक्षणक्रम पात्रतेसंबंधी कागदपत्रे अभ्यासकेंद्राकडे जमा करावयाचे आहे. संबंधित अभ्यासकेंद्राने अशा विद्यार्थ्यांच्या याद्या त्यांच्या सही शिक्क्यानिशी विभागीय केंद्रावर दि. २० जुलै २०२१ पर्यंत जमा कराव्यात. सर्व विभागीय केंद्रांनी त्यांच्या अंतर्गत असलेल्या अभ्यासकेंद्रावरून प्राप्त झालेल्या याद्या दि. २५ जुलै २०२१ पर्यंत Excel Format मध्ये मुख्यालयातील eligibility@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडी वर पाठवावे.

९. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य :-
ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य हा पर्याय निवडून ऑनलाईन प्रवेशअर्ज भरला आहे. परंतु संबंधित प्रमाणपत्र प्रवेशअर्जासोबत जोडलेले नाही किंवा जोडलेले प्रमाणपत्र अस्पष्ट आहे. अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश तात्पुरते मान्य करण्यात आले आहे. सदरचे प्रवेश अंतिमरित्या मान्य करण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी आवश्यक ते प्रमाणपत्र दि. २५ जुलै २०२१ पर्यंत मुख्यालयातील eligibility@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडी वर पाठवावे. मेल पाठवितांना आपले संपूर्ण नाव, प्रवेशअर्ज क्रमांक (Application Form No.) कायम नोंदणी क्रमांक, शिक्षणक्रमाचे नाव, शिक्षणक्रमाचे वर्ष इत्यादी माहिती द्यावयाची आहे.

विशेष सूचना :-

वरील मुद्दा क्र. १ ते ९ यामध्ये अंतर्भाव असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या याद्या संबंधित विभागीय केंद्रांना पाठविण्यात येत आहेत. विभागीय केंद्रांनी त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या अभ्यासकेंद्रानुसार याद्यांची वर्गवारी करून संबंधित अभ्यासकेंद्रांना पाठवावयाचे आहेत. अभ्यासकेंद्रांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावासमोर दर्शविलेल्या त्रुटी लक्षात घेऊन व त्यावर करावयाची कार्यवाहीची पूर्तता नमूद केलेल्या पद्धतीनुसार व विहित मुदतीत करणे अनिवार्य आहे.

सहायक कुलसचिव
नोंदणी कक्ष, वि.से.वि.

संचालक
विद्यार्थी सेवा विभाग